महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

जावक क्रमांक : तंशिविकापु/विवि/२०२१-२०२२/४२९० दिनांक : 21 SEP 2021

**अत्यंत महत्वाचे / कालमर्यादित**

प्रति,
संचालक/प्राचार्य,
या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या,
व्यावसायिक अभ्यासक्रम राबविणा-या,
सर्व पदवी व पदव्युत्तर संस्था (पुणे विभाग)

**विषय** - शैक्षणिक वर्ष २०२१-२०२२ साठी तांत्रिक व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या केंद्रिभूत (कॅप) प्रवेशासाठी संस्थांची माहिती पडताळणी करुन अद्ययावत करणेबाबत .....

**संदर्भ** – १) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचे पत्र क्र.१०/एडीएम//इनटेक अप्रुव्हल / २०२१/४५२ दि.१७-०६-२०२१
२) या कार्यालयाचे पत्र क्र तंशिविकापू/विवि/इनटेक अप्रुव्हल /२०२१-२२/२५८५ दि. २१-०६-२०२१

उपरोक्त विषयाचे संदर्भ क्र १ चे पत्र या कार्यालयास प्राप्त झाले असून सदर पत्राच्या अनुषंगाने, या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या पदवी व पदव्युत्तर पदवी संस्थांना परिपत्रकाव्दारे सूचित करण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२१-२०२२ वर्षासाठी सर्व पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या केंद्रिभूत प्रवेश प्रक्रिया राज्य सामायिक प्रवेश परिक्षा कक्षाकडून करण्यात येत असून पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी संस्थांना शिखर परिषदांची मान्यता, त्यानुसार संबंधित विद्यापीठांकडून सलग्निकरण प्रदान केल्याची माहिती अद्ययावत करुन पडताळणी करण्याबाबत संदर्भाधीन पत्रान्वये यापूर्वी कळविले आहे.

या विभागीय कार्यालयाच्या लॉगीन मध्ये संस्थांकडून प्राप्त झालेल्या माहितीची पडताळणी करण्यात आली असून ज्या संस्थांनी अपूर्ण कागदपत्रे अथवा चूकीची प्रवेशक्षमता अपलोड केली आहे. अशा संस्थांची माहिती दुरुस्ती करीता / आवश्यक कागदपत्रे अपलोड करण्याकरीता संस्थांच्या लॉगीन मध्ये परत पाठविण्यात आली आहे. अशा संस्थांची यादी सोबत जोडली असून यादीतील सर्व संस्थांनी आवश्यक ती सर्व कागदपत्रे अपलोड करुन माहिती दि. २४/०९/२०२१ सायंकाळी ५:०० वा पर्यत पुनःश्च सादर करावी. सदरची मुदत ही अंतिम असून यामध्ये कोणत्याही प्रकारची मुदतवाढ देण्यात येणार नाही याची गांभिर्याने नोंद घ्यावी. तसेच माहितीमध्ये कोणत्याही प्रकारची चूक असणार नाही याची दक्षता घ्यावी. वरिष्ठ कार्यालयाने सदरची लिंक बंद केल्यास संस्थेच्या अभ्यासक्रमांना या कार्यालयाव्दारे मान्यता देता येणार नाही. सबब सदर संस्थांचा समावेश केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेमध्ये करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी. तसेच ज्या संस्थांच्या प्रवेशक्षमतेमध्ये वाढ/घट किंवा नविन अभ्यासक्रमास मंजूरी मिळाली आहे. अशा संस्थांनी तंत्रशिक्षण संचालनालयाची अंतिम मान्यता पत्र व प्रोसेसिंग फी भरल्याची पावती अपलोड करणे आवश्यक आहे, आणि PIO/OCI/FN/quota मंजूर असणा-या संस्थांनी शैक्षणिक वर्ष २०२०-२०२१ व २०२१-२०२२ करीता नोंदणी शुल्क भरल्याची पावती हस्तदेय सादर करावी.

तसेच ज्या संस्थांची प्रवेश क्षमता व माहिती या कार्यालयाने तपासून मंजूर केली आहे अशा संस्थांनी सदर मंजूर केलेल्या माहितीची पडताळणी करावी व शैक्षणिक वर्ष २०२०-२०२१ व २०२१-२०२२ करीताची मंजूर प्रवेश क्षमता बिनचूक असल्याची खात्री करावी. मंजूर केलेल्या प्रवेश क्षमतेमध्ये दुरुस्ती असल्यास तात्काळ या कार्यालयाशी दूरध्वनीव्दारे ०२०-२५६५६२३४ विस्तारीत क्र. २०६ वर संपर्क साधून आवश्यक ती दुरुस्ती करुन घ्यावी.

आपल्या संस्थेने भरलेल्या माहितीच्या आधारे केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियोकरिता प्रवेशक्षमता निश्चित करण्यात येणार असल्याने व सदरची माहिती प्रवेशासंबंधी असल्याने माहितीची संवेदनशीलता व तातडी लक्षात घेवून प्रवेशक्षमतेबाबतची माहितीच्या अचूकतेबाबत योग्य दक्षता घेण्यात यावी. संस्थेने चुकीची माहिती भरल्यास व त्यानुसार प्रवेश प्रक्रियेमध्ये अडचणी उद्भवल्यास, त्यास संबंधित संस्था सर्वस्वी जबाबदार राहील याची नोंद घ्यावी

(डॉ.द.व्यं.जाधव)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे

प्रत – प्रोग्रामर यांना या कार्यालयाच्या संकेत स्थळावर प्रदर्शित करणेसाठी.